**B.A. (Part—I) (Semester—II) Examination**

**(Literature of Modern Language)**

**MARATHI LITERATURE**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना** :— एकूण **5** प्रश्न सोडविणे आवश्यक.

1. संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :—

(अ) ''उद्या ह्या सगळ्या तसबिटींच्या ऐवजी फक्त एक तसबीर भींतीवर लावायची-आईची !''

**किंवा**

''शितावरून भाताची परीक्षा होते तशी बुटावरून माणसाची पारख होत असते.''

(ब) ''स्त्रियांचे प्रश्न गेल्या तीस वर्षात असंख्य पटींनी वाढलेले आहेत. माझ्या डोक्यात काही योजनाही आहेत पण माझा नाइलाज आहे.''

**किंवा**

''तुझ्या असल्या वागण्यामुळे घराला काय अवकळा आलीय बघ! दोन वेळच्या चहाला महाग झालोय मी.''

(क) 'साय मी खातो मराठीच्या दुधाची मी कुणाचा उंबरा झिजवू कशाला ?'

**किंवा**

'कसा झाला हा मानूसं कळू निंबाचा रे पाला येलं काकळीचा होता बारं कारल्याचा आला'.

(ड) 'आदिवासी म्हणजे
सर्वांनीच
आप आपल्यासाठी
उभारलेली एक प्रयोगशाला!'

**किंवा**

'ह्या नथाने ह्या भुईला दान द्यावे
आणि ह्या मातीतुनी चैतन्य गावे
कोणती पुण्ये अथी येती फळाला
जोंधळ्याला चांदणे लखडून जावे.' 16

2. 'आई' — चे स्वभावचित्र 'आई रिटायर होतेय' या नाटकाच्या आधारे चित्रित करा.

**किंवा**

'आई रिटायर होतेय' — नाटकातील संघर्षाचे स्वरूप तुमच्या शब्दात स्पष्ट करा. 16

3. (अ) 'आई' आणि 'बेबी' यांच्या नात्यातील अनुबंध 'आई रिटायर होतेय' या नाटकाच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

'पापा' — चे व्यक्तिचित्र 'आई रिटायर होतेय'या नाटकाचे आधारे चित्रित करा. 8

(ब) आई ने केलेल्या स्त्रियांसाठीच्या कार्याचा आढावा 'आई रिटायर होतेय' या नाटकाच्या आधारे द्या.

**किंवा**

'वीणा' — चे स्वभावचित्र 'बाई रिटायर होतेय' या नाटकाच्या आधारे रेखाटा. 8

4. (अ) स्वातंत्र्य प्राप्ती नंतर चा भ्रमनिराश कवी सुरेश भट्ट यांनी 'उषःकाल होता होता' — या गीतातून कसा व्यक्त केला आहे.

**किंवा**

कवी यशवंत मनोहर यांच कवितांमधून आंबेडकरी बाणा कसा साकार झाला आहे ते लिहा. 8

(ब) कल्पना दुधाळ यांच्या कवितांमधून स्त्री भावविश्वाचे चित्र कसे आले आहे ? ते लिहा.

**किंवा**

खालीलपैकी **एका** कवितेचे रसग्रहण करा :—

(1) गोंगलू.

(2) साहेबराव पाटील.

(3) शतके. 8

5. खालील वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नातील अचूक उत्तरे निवडा :—

(1) 'आई रिटायर होतेय'. या नाटकात शिक्षिकेच्या भूमिकेत कोण आहे ? 1

(अ) सुधा (ब) नेत्रा

(क) सावित्री (ड) वीणा

(2) मंदार ने गाडी कशाकरिता घेतली असते ? 1

(अ) फॅक्टरीच्या कामासाठी (ब) भाड्याने देण्यासाठी

(क) सहलीकरिता जाण्यासाठी (ड) पपांना फिरण्यासाठी

(3) आई पूर्वी कोणत्या संघटनेमध्ये कार्य करीत होती ? 1

(अ) महिलामंडळ (ब) वनिता समाज संघटना

(क) जनसेवादल (ड) जनतादल

(4) बेबीचे बाळतपण कोणत्या मॅटर्निटी मध्ये होते ? 1

(अ) आस्था मॅटर्निटी (ब) उमा मॅटर्निटी

(क) शुश्रूषा मॅटर्निटी (ड) श्रेया मॅटर्निटी

(5) आईने कोणत्या विषयावर प्रबंध लिहिलेला असतो ? 1

(अ) भारतीय महिलांवर होणारे अत्याचार (ब) महाराष्ट्रातील आदिवासींचे प्रश्न

(क) कामगार स्त्री समस्यांची व्याप्ती (ड) शेतकरी वर्गाचे शोषण

(6) वीणा चे माहेर कोणत्या परिसरात असते ? 1

(अ) गिरगाव (ब) विलेपार्ले

(क) बांद्रा (ड) वसई

(7) बेबीच्या पतीचे नाव काय आहे ? 1

(अ) सुरेश (ब) उमेश

(क) अमीत (ड) सुमीत

(8) 'आई रिटायर होतेय', हे कोणत्या प्रकारचे नाटक आहे ? 1

(अ) पौराणिक नाटक (ब) ऐतिहासिक नाटक

(क) विनोदी नाटक (ड) स्त्रीवादी नाटक

(9) जन्मभर दावणीला कोण बांधले असते ? 1

(अ) बाय आणि गाय (ब) शेळ्या आणि उंट

(क) मेंढ्या आणि वासरं (ड) हरिण आणि आस्वल

(10) 'गोंगलू' — कवितेचे कवी कोण ? 1

(अ) विठ्ठल वाघ (ब) यशवंत मनोहर

(क) ना.धो. महानोर (ड) प्रभू राजगडकर

(11) उष:काल होता होता __________ झाली ! 1

(अ) लख्ख सकाळ (ब) काळरात्र

(क) संध्याकाळ (ड) तप्त दूपार

(12) ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे

आणि ह्या मातीतुनी __________ गावे. 1

(अ) चैतन्य (ब) गाणी

(क) उगवून (ड) उजळून

(13) 'मेंढर' — कवितेमधून काय सूचित होते ? 1

(अ) मेंढराप्रमाणे वर्तणूक करणारी ग्रामीण जनता

(ब) मेंढ्या आणि धनगर यांच्यातील नाते

(क) शेतकरी आत्मत्या मागील कारणे

(ड) मेंढ्यांच्या जातीबद्दलची माहिति

(14) कल्पना दूधाळ यांच्या कवितांमूधन प्रामुख्याने कोणता आशय सूचित होतो ? 1

(अ) आदिवासींचे दु:ख (ब) कामगारांचे प्रश्न

(क) शेतकऱ्यांचे शोषण (ड) स्त्रीची व्यथा

(15) 'तडफड' — कवितेचे कवी कोण ? 1

(अ) यशवंत मनोहर (ब) विठ्ठल वाघ

(क) दि.पु. चित्रे (ड) ना.धो. महानोर

(16) माझिया गीतांत वेडे दु:ख __________ भिनावे. 1

(अ) मातेचे (ब) संतांचे

(क) जातीचे (ड) मातीचे.

139 139 139 139 139